**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.**
दूरध्वनी : २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२, २२६९००७
तार : **EDUTECH** **E-mail:-** desk9@dte.org.in **Web:-** http://www.dte.org.in

क्र. ९(२)/तंशिसं/२०१०/शा.१५४९
दिनांक – 2 फरवरी FEB 2012

प्रति,
मा. प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई – ४०० ०३२.

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय
कराड (विद्यानगर)
आवक क्रमांक- 340
दिनांक- 6 FEB 2012

विषय शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड येथे पदवी अभ्यासक्रमाकरीता शिक्षकीय व शिक्षकेतर पदे निर्माण करण्याबाबत...

संदर्भ- १) या संचालनालयाचे प्रस्ताव पत्र क्र. ९(२)/तशिसं/२०१०-११/४१४६ दि.३-६-२०११
२) शासन पत्र क्र.टिइडी-२०११/(१५/११)/तांशि-५ दि.१२-०१-२०१२

महोदय,

वरील संदर्भीय शासन पत्राच्या अनुषंगाने शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड येथे शिक्षकीय व शिक्षकेतर पदांच्या निर्मितीबाबतचा प्रस्ताव शासनाने निर्देश केल्यानुसार शासनास सादर करण्यात येत आहे. संस्थेने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या विद्यार्थी शिक्षक १:१५ व प्राध्यापकः सहा.प्राध्यापकः अधिव्याख्याता प्रमाण १:२:६ च्या गुणोत्तर मानकानुसार नवीन सुधारीत प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार नवीन ५ शिक्षकीय पदांच्या पदनिर्मिती बरोबरच १ पद परत करावे असे प्रस्तावित केलेले आहे. त्यासोबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार आवश्यक शिक्षकतेर ३० पदांच्या निर्मितीबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्याबाबतचे पदनिहाय खर्चाचे व बचतीचे विवरणपत्र सोबत सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त शासन पत्रात नमूद केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने शासनास कळाविण्यात येते की, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड येथे पदवी औषधनिर्माणशास्त्र हा एकच पदवी अभ्यासक्रम सन १९६४ पासून सुरु असून शैक्षणिक वर्ष २००४-०५ मध्ये सदर अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ३० ऐवजी ६० करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. (सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.) प्रवेश क्षमतेच्या वाढीमुळे सदरहू संस्थेत प्रयोगशाळा परिचर हे एकही पद मंजूर नाही. तसेच प्रयोगशाळा सहाय्यकाची ३ पदे मंजूर आहेत. कनिष्ठ लिपिक/रोखपाल फक्त १ पद मंजूर आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार १५ प्रयोगशाळा परिचर व ८ प्रयोगशाळा सहाय्यक आवश्यक आहेत. सोबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मानकांच्या आवश्यक प्रतींची प्रत सोबत जोडली आहे.

D:\PHAM.KARAD\Post creation New.doc

6-2-12
6/2/12



Scanned by CamScanner

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड येथे पदवी विभागात शिक्षक व शिक्षकेतर पदे मंजूर व आवश्यक असलेली पदे खालिलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | पदाचे नांव | मंजूर पदे | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार एकूण आवश्यक पदे | संस्थेत नव्याने निर्माण करावयाची आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|
| १. | प्राचार्य | १ | १ | निरंक |
| २. | प्राध्यापक औषधनिर्माणशास्त्र | १ | २ | १ |
| ३. | सहयोगी प्राध्यापक सेंद्रिय रसायनशास्त्र | १ | सदर पद समर्पित करण्यासाठी प्रस्तावित | निरंक |
| ४. | सहयोगी प्राध्यापक औषध रसायन | १ | २ | १ |
| ५. | सहयोगी प्राध्यापक औषधनिर्माणशास्त्र | २ | ४ | २ |
| ६ | सहाय्यक प्राध्यापक औषधनिर्माणशास्त्र | ८ | ८ | निरंक |
| ७ | सहाय्यक प्राध्यापक औषधवनस्पतीशास्त्र | ० | १ | १ |
| ८ | ग्रंथपाल | निरंक | १ | १ |
| ९ | कॉम्प्यूटर प्रोग्रामर | निरंक | १ | १ |
| १० | सहाय्यक ग्रंथपाल | निरंक | १ | १ |
| ११ | प्रबंधक | १ | १ | निरंक |
| १२ | प्रमुख लिपिक | १ | १ | निरंक |
| १३ | वरिष्ठ लिपिक | २ | २ | निरंक |
| १४ | लघुलेखक | १ | १ | निरंक |
| १५ | भांडारपाल | १ | १ | निरंक |
| १६ | पाणी सं.रक्षक | १ | १ | निरंक |
| १७ | प्रयोगशाळा सहाय्यक | ३ | ८ | ५ |
| १८ | वीजतंत्री | १ | १ | निरंक |
| १९ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | २ | ३ | १ |
| २० | कनिष्ठ लिपिक | १ | ३ | २ |
| २१ | भांडारपरिचर | १ | १ | निरंक |
| २२ | ग्रंथालय परिचर | १ | १ | निरंक |
| २३ | शिपाई | १ | १ | निरंक |
| २४ | हमाल | ४ | ४ | निरंक |
| २५ | माळी | १ | १ | निरंक |
| २६ | सफाईगार | १ | १ | निरंक |
|  | एकूण | ३७ | ५२ | १६ |

Scanned by CamScanner

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड या संस्थेमध्ये पदवी औषधनिर्माणशास्त्र हा पदवी अभ्यासक्रम असून प्रवेशक्षमता ३० ऐवजी ६० करण्यास शैक्षणिक वर्ष २००४-२००५ मध्ये शासन निर्णय क्र.टिइएम-२००४/(१३५/०४)/तांशि-१ दि.१ जून २००४ अन्वये सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच संस्थंत बायो फार्मा. व फार्मा. केमिस्ट्री हे पदव्युत्तर अभ्यासक्रमसुध्दा प्रत्येकी १२ व ८ प्रवेशक्षमतेसह चालविले जातात. सोबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेची प्रत तसेच शासन निर्णयाची प्रत जोडत आहे. महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर या दोन्ही अभ्यासक्रमासाठी मिळून शिक्षक व शिक्षकेतर एकूण ३७ पदे मंजूर आहेत. पदव्युततर अभ्यासक्रमांसाठी अद्याप एकही पद मंजूर झालेले नाही. महाविद्यालयातील एकूण पदांची सविस्तर माहिती सोबत जोडण्यात येत आहे.

महाविद्यालयात सेंद्रिय रसायनशास्त्र या विषयाचे सहयोगी प्राध्यापक सेंद्रिय रसायनशास्त्र हे पद मंजूर आहे. सदर पद सध्या रिक्त आहे. सदर पद रिक्त असल्याने समर्पित केल्यास काहीही परिणाम होणार नाही. सेंद्रीय रसायनशास्त्र हे शिक्षकीय पद विज्ञान शाखा अंतर्गत येत असल्याने सदर पदांसाठी औषधनिर्माण अभ्यासक्रमा व्यतिरिक्त उमेदवार दावा करु शकतात. त्याचा परिणाम औषधनिर्माणशास्त्र शाखेवर व प्रामुख्याने अभ्यासक्रमावर होऊ शकतो. म्हणून सदर पद समर्पित करुन त्याऐवजी सहाय्यक प्राध्यापक औषधवनस्पतीशास्त्र हे पद निर्माण करण्यास शासनास विनंती आहे. प्राध्यापक सेंद्रिय रसायनशास्त्र या पदाच्या ऐवजी सहाय्यक प्राध्यापक औषध वनस्पतीशास्त्र हे त्यापेक्षा कमी वेतनश्रेणीतील पद निर्माण केल्यास शासनावर येणार आर्थिक भार सोबतच्या विवरणपत्र ब मध्ये दर्शविण्यात आला आहे. तसेच दोन्ही पदांची वेतनश्रेणी भिन्न असल्याचे दर्शविण्यात आलेले आहे.

प्रस्तावित नवीन पदांची पदनिर्मिती झाल्यानंतर सदर पदांसाठी आवश्यक असणारा निधी वार्षिक योजने मध्ये मंजूर झालेल्या नियतव्ययातून भागविण्यात येईल. सदर पदांसाठी खर्चाचे विवरणपत्र अ, व ब सोबत जोडले आहे.

प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या पदांच्या वेतनाचा खर्च मागणी क्र.डब्ल्यू-३ -२२०३ - तंत्रशिक्षण -११२ - अभियांत्रिकी तंत्र महाविद्यालये व संस्था - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - ११२- (००)(०२) शासकीय अभियांत्रिकी व वास्त्रुशास्त्र महाविद्यालयांचा विकास व विस्तार (२२०३ ०३३६) ०१ - वेतन या लेखाशिर्षाखाली दर्शाविला जाईल.

शासनास विनंती करण्यात येते की, सन २००४-०५ पासून प्रवेशक्षमतेत ३० ने वाढ झाल्यापासून अद्याप एकही पद मंजूर नसल्याने सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांमध्ये नाराजी व असंतोष आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता, पुढील अनुचित प्रकार घडू नये, विद्यार्थी व पालकांमध्ये असलेले काळजीचे वातावरण कमी व्हावे, विद्यार्थ्यांना किमान सुविधा देण्याच्या दृष्टीने या अभ्यासक्रमासाठी पदनिर्मिती होणे आवश्यक आहे.

शासनास विनंती करण्यात येते की, प्रस्तावित शिक्षक व शिक्षकेतर पदांची लवकरात निर्मिती करण्यात यावी.

आपला

(डॉ.सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

सोबत - वरीलप्रमाणे

प्रत – प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड

Scanned by CamScanner